# देगलूर महाविद्यालयात 'रासेयो'तर्फे सुशासन दिन

देगलूर, ता.२५ (बातमीदार) : देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने (ता.२५) डिसेंबर रोजी भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस हा 'सुशासन दिन' म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार हे होते तर प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. बी.आर. कन्नुरवार होते. त्यांनी 'तणाव व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करताना सांगतले की सुशासनाच्या निर्मितीसाठी प्रशासन व्यवस्थेतील प्रत्येक आधिकाऱ्याने मला मिळाले पद व आधिकार हे लोकांचे कल्याण करण्यासाठी मिळालेले एक साधन म्हणून उपयोगात आणले पाहीजे. लोकप्रशासनात मुख्यप्रशासकाची भूमिका रेल्वेच्या इंजिन समान असते. रेल्वेचे इंजिन ताशी ज्या गतीने धावते त्याच गतीने सर्व डब्बे ईच्छा असो अथवा नसो धावत असतात. प्रशासनातील ताण तणाव कमी करण्यासाठी कार्यालयात मैत्रीपुर्ण संबंध जोपसावे, सर्वांना समान वागणूक द्यावी, कोणत्याही परिस्थितीत नियम व कायद्याची चौकट ओलांडू नये असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार डॉ. खंदकुरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद काळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता डॉ. सुरेश काशीदे यांच्यासह इतरांचे सहकार्य लाभले.